# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६७४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/१०/२०१६

१) भांडण करून अश्लिल शब्दात शिविगाळ करुन चाकुने जखमी केले. :—

दिनांक १९/०८/२०१६ रोजी ११.१५ वा. दर. यातील फिर्यादी व आरोपी क्र. १ हे एकमेकांचे नातेवाईक असुन त्यांचे कौटुंबिक वाद सुरू आहे फिर्यादी हे आपल्या पती सह मोटार सायकल ने जात असता आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस जबरदस्तीने थांबवुन भांडण करून अश्लिल शब्दात शिविगाळ करून उजवे हातावर चाकु मारून जखमी केल्याने फिर्यादीने मा. जेएमएफसी. साहेब मोहाडी यांचे कडे अर्ज दिल्याने मा. जेएमएफसी. कोर्ट मोहाडी यांचे मिस्क्री क्र. १७९/१६ जावक क्र. ५४१/१६ दि. ०२/१०/२०१६ चे अन्वय आदेश प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२४,३४१,२९४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

२) पत्रकांराची राज्य परिवहनाची बनावटी पास तयार करुन संगनमत केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०१/०८/२०१६ ते १०/१०/२०१६ दर. यातील आरोपीने पत्रकारांना देण्यात येणारी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळा तर्फे मोफत प्रवास पास कोणत्यातरी अनाधीकृत व्यक्ती कडुन संगनमताने बनावट पास तयार करुन माहे १ ऑगस्ट २०१६ पासुन सदर पासचा गैरवापर करुन म.रा.परी.महा मंडळाची अप्रामाणीकपने स्वतःचे लाभा करीता वापर करुन राज्य परीवहन महामंडळाची फसवणुक केल्याने फिर्यादी विजय प्रेमदास चंदनकर वय ४९ वर्ष, रा. नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे. भंडारा येथे कलम ४२०,४६८,४७१,४७३,४७६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक १३/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०२ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तिन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व ईतर वाहनांवरती ९२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता